संक्षित फौ. ख. क्र. २८३/२०२६
निशाणी - ३

न्यायाधीश श्री. गोविंद एस. वर्पे, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मुरबाड यांच्या न्यायालयात.

| | | |
|---|---|---|
| ०१ | अपराध घडल्याचा दिनांक | दिनांक २४/०२/२०२६ रोजी |
| ०२ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | दिनांक २४/०२/२०२६ रोजी |
| ०३ | फिर्यादीदाराचे नांव, त्यांचे वडिलाचे व आईचे नांव, त्यांचे वय व निवासस्थान | पोहवा/४३७२/गणेश मल्हारी फर्डे, नेम- टोकावडे पोलिस स्टेशन जि. ठाणे |
| ०४ | आरोपीचे नांव, त्यांचे वडिलाचे व आईचे नांव, त्यांचे वय व निवासस्थान | एकनाथ वामन पवार, वय – ५५ वर्षे, रा.सोनगांव, ता. मुरबाड, जि.ठाणे |
| ०५ | (अ) ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपाराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | दिनांक २४/०२/२०२६ रोजी १५.३० वाजताचे सुमारास आरोपीने त्याचे ताब्यातील बोलेरो क्र. एम.एच.०६ बी.एफ.१२१४ ही सार्वजनिक रोडवर येणारे जाणारे लोक व वाहनांचे रहदारीस अडथळा होईल त्यांना धोका व इजा होईल अशा पध्दतीने उभी केलेली मिळुन आला म्हणुन भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये गुन्हा केला व तो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येतो. |

०६ **<u>आरोपीचे प्रतिकथन</u>**

प्रश्न : तुम्हाला पोलिस पेपरच्या नकला मिळाल्या का?

उत्तर : होय.

प्रश्न : तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप तुम्हाला वाचुन दाखविला आणि तो तुम्हाला समजला का?

उत्तर : होय.

प्रश्न : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर : होय.

दिनांक -: १४/०३/२०२६

समक्ष

-------------------------
(आरोपीची सही)

**(गोविंद एस. वर्पे)**
पॅनल प्रमुख,
राष्ट्रीय लोकअदालत, मुरबाड

## आदेश

आज रोजी आरोपी विरोधात भारतीय न्याय संहिता-२०२३ कलम २८५ अंतर्गत खटला दाखल करण्यात आला. आरोपीने निशाणी २ प्रमाणे पुरसिस दाखल करून त्याला गुन्हा कबुल असल्याचे कळविले आहे व कमीतकमी दंड करण्याची विनंती केली. आरोपीच्या गुन्हयाचे स्वरूप विचारात घेता त्याला दंडात्मक शिक्षा करणे उचित ठरणार आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

१. आरोपी एकनाथ वामन पवार, वय – ५५ वर्षे, रा.सोनगांव, ता. मुरबाड, जि.ठाणे यांस भारतीय न्याय संहिता-२०२३ कलम २८५ च्या गुन्हयासाठी भा.ना.सु.स. कलम २७८(२) नुसार दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीस ५०० रूपये /- (पाचशे रुपये मात्र) दंडाची शिक्षा करण्यात येत आहे. दंडाची रक्कम न भरल्यास २ दिवसाच्या साध्या तुरूंगवासाची शिक्षा देण्यात येत आहे.

३. खटल्याचे कामकाज बंद करण्यात येते.

VARPE GOVIND SITARAM

Digitally signed by VARPE GOVIND SITARAM
Date: 2026.03.14 15:23:06 +0530

दिनांक :- १४/०३/२०२६

**(गोविंद एस. वर्पे)**
पॅनल प्रमुख,
राष्ट्रीय लोकअदालत, मुरबाड